विशेष लेख क्र.२८८

१५ आश्विन १९२८ शके (सायं. ५.३० वा.)
शनिवार, दि.७ ऑक्टोबर २००६

# ऑपरेशन क्यूब्रीज...

**रत्नागिरी जवळ रनपार बंदरात वाळूत रुतलेले 'क्यूब्रीज' हे गॅसवाहू जहाज संपूर्णपणे सुरक्षित असून, ते बाहेर काढण्यासाठी प्रयत्न सुरु आहेत. सध्या ड्रेझरद्वारे वाळू उपसून जहाज जेटीजवळ आणण्याचे प्रयत्न सुरु आहेत. जहाजातून कुठलीही गॅसची गळती होत नसून, नागरिकांनी स्थलांतर करु नये. एकूणच ऑपरेशन क्यूब्रीज यशस्वी होऊन आठवडाभरात रनपार परिसर संकटमुक्त होण्याचा सर्वांनाच विश्वास वाटू लागला आहे. ऑपरेशन क्यूब्रीजचा हा आढावा !**

कोकणी माणूस तसा सण उत्सवात रमणारा, आनंदाने जीवन जगणारा म्हणून सर्वांना परिचित आहे. नुकताच गणेश उत्सव धुमधडक्याकात साजरा केल्यानंतर ऐन नवरात्रात गॅसवाहू **'क्यूब्रीज'** जहाज प्रकरणाने रत्नागिरी परिसरातील जनता भयभीत झाली. मात्र जिल्हाधिकारी विकासचंद्र रस्तोगी यांच्या मार्गदर्शनाखाली संबंधित सर्व अधिकाऱ्यांनी परिस्थिती पूर्ण नियंत्रणात आणून जिल्हा प्रशासनाने ग्रामस्थांना दिलासा दिला आहे.

रत्नागिरीपासून चौदा कि.मी. अंतरावर असलेल्या रनपार बंदरात जवळपास पंधरा दिवसापासून वाळूत रुतलेले हौन्सियाटिक कंपनीचे एलपीजी गॅसवाहू **'क्यूब्रीज'** जहाज रुतलेले आहे. या जहाजात नऊ हजार मे.टन ब्युटेन गॅस आहे. तो अत्यंत ज्वलनशील आणि धोकादायक असल्याने, जनतेत भीती निर्माण झाली होती. प्रारंभी हे जहाज बाहेर काढण्यासाठी कंपनीतर्फे मुंबईहून आलेल्या दोन टगचा वापर करण्यात आला. मात्र हे जहाज जागचे हलले नाही. त्यानंतर सिंगापूरहून दोन टग आणण्यात आले. मात्र प्रचंड हवा आणि पावसामुळे सातत्याने व्यत्यय आला. त्यामुळे त्याचाही उपयोग झाला नाही.

अशा परिस्थितीत धोका निर्माण होण्याची शक्यता निर्माण झाल्याने वरिष्ठ पातळीवरुन हालचाली सुरु झाल्या आणि जिल्हाधिकाऱ्यांनी तातडीने बैठक घेऊन परिस्थितीचा आढावा घेतला. फिनोलेक्स कंपनी, भारत गॅस कंपनी, शिपींग कार्पोरेशन ऑफ इंडिया, पोर्ट ऑफीस, बंदर अधिकारी, ऑईल सेफ्टी ऑफीस, प्रदुषण मंडळ आदी विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी जहाजाची पाहणी करुन, आपला अहवाल जिल्हा प्रशासनाला दिला. जिल्हाधिकाऱ्यांनी या सर्व अधिकाऱ्यांसमवेत सुरक्षेबाबत चर्चा करुन परिस्थितीचा आढावा घेतला. त्यानंतर रिलायन्स कंपनीचे जहाज बोलविण्याचा निर्णय घेण्यात आला. दुर्घटनाग्रस्त **'क्युब्रीज'** जहाजातून रिलायन्सच्या **'नयनतारा'** जहाजात गॅस स्थलांतर करण्याचे ठरले. त्याप्रमाणे तीन दिवसात जहाज आले आणि कार्यवाही सुरु केली. मात्र अनेकदा प्रयत्न करुनही गॅस स्थलांतर होऊ शकला नाही. कुठलाही धोका निर्माण होऊ नये म्हणून जहाजापासून ५०० मिटर परिसरातील ग्रामस्थांना या परिसरात येण्यास प्रशासनाने बंदी घातली. यामुळे ग्रामस्थांत भीती निर्माण झाली, मात्र सुरक्षिततेच्या दृष्टीने जिल्हा प्रशासनाने योग्य निर्णय घेतला.

**मंत्र्यांकडून दिलासा**

दरम्यान जिल्ह्याचे पालकमंत्री हसन मुश्रीफ आणि विरोधी पक्षनेते रामदास कदम यांनी प्रत्यक्ष जहाजाची पाहणी केली. वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत चर्चा केली. जनतेला कोणताही धोका निर्माण होणार नाही, स्थलांतर करावे लागणार नाही, अशा पद्धतीने जहाज तातडीने बाहेर काढण्याच्या सूचना त्यांनी संबंधितांना दिल्या. मंत्र्यांच्या दौऱ्यात परिसरातील ग्रामस्थांनी मंत्रीमहोदयांची भेट घेवून सविस्तर निवेदन दिले. त्यात त्यांनी सुरक्षेची

...२/-

मागणी केली. त्याचबरोबर फिनोलेक्स कंपनीच्या जेटीवरुन अशाप्रकारची धोकादायक गॅस वाहतूक करु नये, ही कंपनी स्वत:चा धंदा चालू ठेऊन जनतेला असुरक्षित ठेवत आहे जनतेच्या जीवनाशी खेळत आहे. अशा संतप्त शब्दात आपले म्हणणे मांडले. पालकमंत्र्यांनी आंदोलन न करण्याचे जनतेला आवाहन केले. सरकार संपूर्णपणे जनतेच्या पाठीशी असल्याचे सांगून ग्रामस्थांना त्यांनी शांत केले.

**जिल्हा प्रशासन सतर्क**

या संपूर्ण घटनेच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी यांनी तातडीने जिल्हा आपत्तीव्यवस्थापन प्राधिकरणाची बैठक बोलवली आणि सुरक्षेच्या उपाययोजनांची चर्चा केली. त्यानुसार पोलीस यंत्रणा, आरोग्य विभाग, बंदर अधिकारी, बांधकाम विभाग, पुरवठा विभाग, स्वयंसेवी संस्था आदि विभागाच्या अधिकाऱ्यांना सुरक्षितेच्या दृष्टीने तयार राहण्याबाबत निर्देश दिलेले आहेत. यासाठी अतिशय चोख व्यवस्था करण्यात आलेली आहे. संबंधित कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सुरक्षितेची लेखी हमी जिल्हा प्रशासनाला दिलेली आहे. अतिशय कौशल्याने जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, निवासी उपजिल्हाधिकारी, प्रांत आणि राज्यशासन या संपूर्ण परिस्थितीवर नियंत्रण ठेऊन आहेत. दरम्यान गॅस वाहू जहाजाची कुलिंग यंत्रणा बंद पडल्याने, हॉलंडवरुन पंप मागवण्यात आले असून कुलिंग यंत्रणा कार्यरत झालेली आहे.

गेल्या काही दिवसापासून संपूर्ण कोकणात चर्चेत असलेला जहाजाचा प्रश्न लवकरच मार्गी लागणार आहे. **'क्युब्रीज'** जहाजातील गॅस बाहेर काढण्याचा प्रयत्न यशस्वी झाला असून, रिलायन्स कंपनीच्या **'नयनतारा'** जहाजात गॅस स्थलांतरित करण्याचे काम सुरु झाले आहे. आतापर्यंत ७२० मे.टन गॅस हा स्थलांतरीत केला असून हे काम आता थांबविण्यात आलेले आहे. आता मुंबईहून आणखी दोन मोठे ड्रेजर आणण्यात आले असून त्यामार्फत रुतलेल्या जहाजाखालील वाळू काढण्याचे काम (ड्रेजींग) सुरु झालेआहे.

गेले दहा दिवस क्यूब्रीजमधील अत्यंत ज्वलनशील आणि धोकादायक गॅस बाहेर काढणे नैसर्गिक कारणामुळे शक्य होत नव्हते, बदलते हवामान आणि समुद्रातील उंच लाटा यामुळे सातत्याने अडथळे येत होते. मात्र या कामास सुरळीतरित्या प्रारंभ झाला. या जहाजात एकूण ९००० मे.टन गॅस आहे. परंतु आतापर्यंत ७२० मे.टन गॅस फिनोलेक्स जेटीवर असलेल्या भारत गॅसच्या टाक्यामध्ये तो रिकामा करण्यात आला. सुरक्षिततेचा उपाय म्हणून ५०० मीटर परिसरात मॉनिटरींग यंत्रणा बसविण्यात आली आहे.

क्यूब्रीज जहाजाभोवतीची वाळू आणि गाळ बाहेर काढण्यासाठी दोन मोठे ड्रेजर काम करीत आहे. हे काम सुरु झाल्याने गॅस काढण्याचे काम थांबविण्यात आले आहे. वाळू आणि गाळ बाहेर काढल्यानंतर क्यूब्रीज जहाज पाण्यावर तरंगेल आणि हे जहाज जेटीवर सुरक्षितरित्या आणता येईल असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. जर हा प्रयत्न अयशस्वी झाला तर पुन्हा गॅस स्थलांतर करण्याची प्रक्रिया सुरु करण्यात येणार आहे !

**मच्छिमार बांधवांना मदत**

रनपार बंदरात **'क्यूब्रीज'** जहाज फसल्यापासून या परिसरातील मच्छिमारी बंद झाली आहे. त्यामुळे त्यांच्या रोजीरोटीचा प्रश्न निर्माण झाला आहे. बंदर परिसरातील अडीच किलोमीटर भागात संपूर्णपणे मच्छिमारांना प्रवेश बंदी केल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली. परंतु जिल्हा प्रशासनाने तातडीने मच्छिमारांचे सर्वेक्षण करुन दररोज प्रत्येक कुटूंबाला ३०० रुपये नुकसान भरपाई देण्याचे आदेश शासनाने दिल्याने मच्छिमार सुखावला आहे. तसेच शासनाचे आदेशानुसार मच्छिमारांना धान्य आणि रॉकेलचे वाटप लवकरच करण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले.

राज्याचे पुनर्वसन मंत्री डॉ.पतंगराव कदम आणि मुख्य सचिव डॉ.डी.के.शंकरन यांनीही तातडीने रत्नागिरीत येऊन जहाजाबाबत माहिती घेतली. त्यांनी रनपार बंदर परिसरात भेट देऊन शिपींग कार्पोरेशनचे

...३/-

अधिकारी, फिनोलेक्स कंपनीचे अधिकारी, तटरक्षक दल, हॉलंड आणि जर्मनीचे तंत्रज्ञ यांच्याशीही चर्चा करुन लवकरात लवकर जहाजातील गॅस बाहेर काढण्याबाबतच्या सूचना दिल्या. अनेक मंत्रीमहोदयांनी रनपार, गोळप, गणेशगुळे आणि पावस परिसरातील ग्रामस्थांशी चर्चा केली. ग्रामस्थांनी आपल्या मागण्यांचे निवेदन त्यांना सादर केले. जनतेचा प्रक्षोभ पाहता डॉ.कदम यांनी मच्छिमार बांधवांसाठी नैसर्गिक आपत्तीच्या नियमाप्रमाणे मच्छिमार बांधवांना मदत म्हणून दहा किलो तांदूळ आणि रॉकेलचे वाटप केले जाईल असे सांगितले. तसेच नागरिकांनी शांतता राखावी, जहाज संपूर्ण सुरक्षित आहे. कोणताही धोका नाही त्याचबरोबर सरकार फिनोलेक्स कंपनीच्या पाठीशी नसून जनतेच्या पाठीशी आहे, असे सांगितले. यावेळी मुख्य सचिव डॉ.शंकरन यांनीही जनतेच्या अडचणी समजून घेतल्या आणि जहाज बाहेर काढण्यासाठी शासनामार्फत सर्वतोपरी सहकार्य केले जाईल, असे सांगितले. सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री रवींद्र पाटील आणि जलसंपदा राज्यमंत्री सुनिल देशमुख हेही रत्नागिरी जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले असता त्यांनी जहाजाची पाहणी केली. तसेच जहाजातील गॅस दुसऱ्या जहाजात गॅस स्थलांतरित करण्यासाठी सुरु असलेल्या कार्यवाहीची आणि पर्यायी उपाययोजनांची माहिती घेऊन जनतेला दिलासा दिला.

**जनजीवन सुरळीत**

रनपार परिसरातील जनजीवन आता सुरळीत सुरु असून, जनतेच्या मनातील भीती दूर झाली आहे. आता स्थलांतरही थांबलेले आहे. फक्त जहाजापासून ५०० मीटर परिसरात अतिदक्षता म्हणून त्याभागात जनतेला प्रवेश बंदी करण्यात आलेली आहे. हे जहाज बाहेर काढण्यासाठी अनेक पर्यायांचा विचार करण्यात येत असून आठवडाभरात हे जहाज यशस्वीपणे बाहेर निघेल अशी अपेक्षा आहेत. त्यादृष्टीने जिल्हा प्रशासन दररोज या प्रकरणी आढावा घेत असून उपाययोजना करत आहे. जहाजाबाबतची माहिती दररोज ध्वनीक्षेपकाद्वारे ग्रामस्थांना कळविण्यात येत आहे. तसेच स्थानिक केबल वाहिन्या आणि आकाशवाणीच्या माध्यमातून जनतेला जहाजाबाबत भीती न बाळगण्याचे आवाहन करण्यात येत आहे. जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हा माहिती कार्यालयाच्यावतीने 'माध्यम कक्ष' तातडीने सुरु केल्याने प्रसारमाध्यमांनाही वेळोवेळी माहिती उपलब्ध करुन देण्यात येत आहे. जिल्हाधिकारी श्री.रस्तोगी हे स्वत: रनपार परिसरातील गावांना भेटी देवून ग्रामसभा घेत आहेत. तसेच ग्रामस्थांच्या मनातील भीती दूर करत आहेत. स्वत: जिल्हाधिकारी ग्रामस्थांच्या सुरक्षिततेची हमी घेत असल्याने परिसरातील नागरिकांच्या मनातील भीती दूर झाली आहे. कुठल्याही अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनाने केलेले असून, ग्रामस्थांमधील भीती दूर करण्यास जिल्हा प्रशासनाला यश आलेले आहे. ऑपरेशन क्यूब्रीज यशस्वी होणार, अशी आता सर्वांनाच खात्री वाटू लागली आहे.

- डॉ.सं.शि.खराट
जिल्हा माहिती अधिकारी,
रत्नागिरी

०००००००००